आजचे कार्यक्रम

सायंकाळी ५.३० वाजता कालीदास कला मंदिरात अलबत्या गलबत्या हे मराठी बालनाट्य सादर होणार आहे . यंदाच हा एक हजारावा प्रयोग नाशिकमध्ये होणार आहे.

रात्री ९.३० वाजता कालीदास कला मंदिरातच विराजस कुलकर्णी विक्रम गायकवाड प्रस्तुत फिल्टर कॉफी हे नाटकही प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. यात अंकीता लांडे, कुणाल मेश्राम, उर्मीला कानेटकर, सुनील पानकर यांच्या भूमिका आहेत.

पंचवटीतील आडगाव नाका परिसरातील संतकृपा ज्येष्ठ नागरिक संघाची महत्त्वाची बैठक जनार्दन स्वामी नगरमधील हनुमान मंदिरात सकाळी १०.३० वाजता होणार आहे. आमदार ॲड. राहुल ढिकले, अंबादास खैरे, शंतनु शिंदे यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

आरडी बर्मन यांच्या गीत मैफलीचे आयोजन. महाकवी कालिदास कला मंदिरात दुपारी १२.३० वा. आरडी वाईब्स ही मैफल होईल. मुंबईतील पार्श्वगायिका अमृता दहिवेलकर यांच्यासह अजय पाटील, राज ढगे, जयदीप जाधव, मयूरी मुर्डेश्वर, दर्शना बडोगे, सारिका शिरुडे हे कलाकार गाणी सादर करणार आहेत.

नाशिकमध्ये सिपेट इन्स्टिट्यूटची लवकर स्थापना

खा. वाजे यांची संभाजीनगर येथील सिपेटला भेट

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा सिपेट (सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग) प्रकल्प नाशिकमध्ये लवकरच सुरू व्हावा, यासाठी खा. राजाभाऊ वाजे यांनी मागील एक वर्षभर पाठपुरावा केला आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून खा. वाजे यांनी नुकतीच संभाजीनगर येथील सिपेट संस्थेला भेट देऊन तेथील कार्यप्रणालीची माहिती घेतली.

गेल्या अनेक दिवसांपासून नाशिकमध्ये सिपेट प्रकल्पासाठी जागा मिळवण्यावरून मतमतांतरे होती. हा विषय मार्गी लागावा, यासाठी खा. वाजे यांनी केंद्रीयमंत्री जे. पी. नड्डा आणि महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, काही दिवसांपूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाशिक येथे सिपेटसाठी १० एकर जागा देण्याची घोषणा केली आहे.

खासदार झाल्यापासून या प्रकल्पासाठी केंद्र तसेच राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. हा प्रकल्प नाशिकच्या विकासात एक मैलाचा दगड ठरणार असून हजारो तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

–राजाभाऊ वाजे, खासदार, नाशिक

सध्या या प्रकल्पाची फाईल महसूल मंत्रालयाकडून कौशल्य विकास मंत्रालयात आली आहे. या प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी देखील खा. वाजे यांचे सातत्याने प्रयत्न सुरू असून लवकरच सर्व तांत्रिक बाबी पूर्ण होऊन प्रकल्प उभारणीला सुरवात होण्याची आशा आहे. नाशिकमध्ये सिपेट इन्स्टिट्यूटची लवकर स्थापना व्हावी यासाठी खा. वाजे लवकरच केंद्रीयमंत्री जे.पी.नड्डा यांची भेट घेणार आहेत.

या प्रकल्पामुळे नाशिकमधील तरुण पिढीला प्लास्टिक निर्मितीचे आधुनिक शिक्षण मिळेल आणि स्थानिक उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल, अशी अपेक्षा खा. राजाभाऊ वाजे यांनी व्यक्त केली.

प्रभाग १५ मध्ये आठवडा उलटूनही पाणी समस्या 'जैसे थे'

टँकरसाठी माजी नगरसेवकांची शिफारस सूचवण्यात येत असल्याने नागरिकांत संताप

नाशिक । तांत्रिक कारणामुळे गेल्या शनिवारी (दि. २१) शहरात पाणीपुरवठा बंद होता. तथापि, त्याच्या दुसऱ्या दिवसापासून तो इतरत्र सुरळीत झाला असला तरी महापालिका प्रभाग क्र. १५ मध्ये आठवडा उलटूनही पाणी समस्या जैसे थे असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

भरीस भर पाण्याचा टँकर मागवण्यासाठी संबंधित महापालिका अधिकारी माजी नगरसेवकांची शिफारस सूचवत असल्याने हा अजब प्रकार नागरिकांच्या सहनशीलतेचा कडेलोट करणारा ठरत आहे. सदर परिस्थितीत तत्काळ सुधारणा न झाल्यास नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे वृत्त आहे.

दि. २१ जूनच्या पाणीबाणीनंतर प्रभाग क्र. १५ मध्ये परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. तांत्रिक समस्या समजून अनेक नागरिकांनी जार अथवा पाणी बाटल्या विकत आणून पाण्याची गरज भागवली. याबाबत अनेकांनी महापालिका विभागीय कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांना मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो बंद असल्याचा प्रत्यय आला. तात्पुरती मलमपट्टी म्हणून प्रशासनाने टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्याचे धोरण अवलंबले. तथापि पाण्याची मागणी वाढल्याने गरजूंनी फोन केले असता अधिकाऱ्यांनी माजी नगरसेवकांची शिफारस असल्यास टँकर पाठवू, असा सल्ला दिला. वस्तुतः, नागरिकांना पाणीपुरवठा करण्याची नैतिक जबाबदारी प्रशासनाची असताना इतर कोणाच्या शिफारशीची गरजच काय, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. नागरिकांच्या या प्रश्नांचे उत्तर संबंधित अधिकाऱ्याकडे नसल्याचे कळते.

प्रभाग क्र १५ मधील पाणीपुरवठा तत्काळ सुरळीत होणे आवश्यक आहे. तथापि सदर परिस्थितीत सुधारणा न झाल्यास नागरिक आंदोलनाच्या पवित्रा घेणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

विवाहितेची आत्महत्या

नाशिक । सातपूर भागात बावीस वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. पूजा महेश गुंजाळ (२२, रा. अशोकनगर, सातपूर) असे तिचे नाव आहे. पूजा यांनी शुक्रवारी (दि. २७) दुपारी घराच्या बेडरुममध्ये साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. पती महेश यांनी तिचा उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. सातपूर पोलिसात मृत्यूची नोंद झाली आहे.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९६०००
२२ कॅरेट	८८३२०
चांदी (प्रति किलो)	
१०६५००	

मायमातीशी असलेली बांधिलकी हाच कवितेचा गाभा : देशमाने

नाशिक । जन्मदाती आई आणि आयुष्यभर पोसणारी भूमी आपल्या आयुष्याला आकार देत असते. त्यांच्या ऋणातून कधीही मुक्त होता येत नाही. मायमातीशी असलेली बांधिलकी हाच माझ्या कवितेचा गाभा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी भास्कर देशमाने यांनी केले.

गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित पुस्तकावर बोलू काही या अभिनव उपक्रमात आंबऱ्या झुंबऱ्या या पुस्तकावर ऐसपैस गप्पा मारताना ते बोलत होते. साहेबराव उगले अध्यक्षस्थानी होते.

देशमाने पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील वास्तव परिस्थिती बदलत आहे. गावगाडा बदलत असताना मायमातीशी घट्ट नातं जपल्याशिवाय गाव, माती, माणसं कळणार नाहीत. तंत्रज्ञान क्रांती झाली; पण शेतकरी आत्महत्या थांबत नाही, ही शोकांतिका आहे. मळ्यातील बैलजोडीशी असलेले नाते हे जिवंत माणसापेक्षा मला अधिक भावते, असे सांगून त्यांनी पुस्तकातील विविध कविता सादर करून त्यांना मंत्रमुग्ध केले.

दत्तात्रय दाणी आणि गोकुळ आहिरे यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.संजय जगताप यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (दि.१) मनमाड येथील सुप्रसिद्ध साहित्यिक संदीप देशपांडे भावलेली माणसं या गाजलेल्या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

बाजारभाव

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगांव	१०९५५	६००	२१००	१५५१
विंचूर	१०५४०	६००	१८३०	१५००
निफाड	--	६००	१७५१	१५११
सायखेडा	--	९००	१९०४	१५८०
पिंपळगाव	--	८००	२२५२	१५७५

आवक निम्म्यावर

नाशिक । प्रतिनिधी

लासलगाव, विचूर बाजारपेठेत २१ हजार क्विंटल कांद्याची आवक झाली. ही आवक दोन दिवसांच्या तुलनेत निम्म्यावर आलेली होती. त्याचबरोबर वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात घटलेली होती. लासलगावला सरासरी १५५१ रुपये क्विंटल दराने कांदा विक्री झाला. तर विचूर आवारातही कांदा दीड हजार रुपये क्विंटल दराने कांदा लिलाव झाला.

मिरचीचा दरवाढीचा ठसका

नाशिक । प्रतिनिधी

भाजी बाजारात सुमारे ३० ते ४० रुपये पावशेर दराने विक्री होणारी मिरची ज्वाला, लवंगी, सितारा प्रकारची मिरची यार्डात घाऊक दरात सुमारे ८० ते ९० रुपये प्रतिकिलोने विक्री होत आहे. लिंबांचे दर उतरले असले तरी घाऊक ५० ते ६० रुपये किलो दराने त्यांची विक्री होत आहे. भेंडी, कारले, भोपळे, ढोबळी, कोबी, फ्लॉवर या फळभाज्यांची आवक यार्डात कमालीची घटली आहे. त्यामुळे दर तेजीत आहेत. तर चांगल्या प्रतीचा माल उपलब्ध होत नसल्याने या भाज्या जास्तप्रमाणात नाशवंत झालेल्या आहेत. तसेच काकडी, दोडके, वांगे, परवल, पडवळ, गाजर यांची आवक परपेठेतून यार्डात होत आहे. त्यामुळे त्यांचेही दर वाढलेले आहेत. मार्केट यार्डाच्या संध्याकाळी होणाऱ्या शेपू, मेथी, कोथिंबिर, कांदापात या पालेभाज्यांची आवक ३० ते ३५ टक्के एवढीच आहे. त्यामुळे पालेभाज्या किरकोळ भाजीबाजारात अवाच्या सव्वा दराने ग्राहकांना खरेदी करावे लागत आहे.

मिनी फुटबॉल फाईव्ह राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपद

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक डिस्ट्रिक्ट ऑल गेम्स असोसिएशन, कालिका मंदिर, यशवंत व्यायामशाळा आणि विविध क्रीडा असोसिएशन यांच्या वतीने नाशिकच्या विभागीय क्रीडा संकुल येथे मिनी फुटबॉल फाईव्ह या खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्या.या स्पर्धेत यजमान महाराष्ट्र संघाने सुंदर खेळाचे प्रदर्शन करून खुल्या गटाचे आणि ज्युनिअर गटचे विजेतेपद पटकावत दुहेरी मुकूट पटकावला.

या स्पर्धेत विविध राज्यांचे १५ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत पहिले तीन क्रमांक मिळवणाऱ्या संघांना प्रमुख पाहुणे नाशिक जिल्हा ऑल गेम्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल देशमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर सिंघ, क्रीडा संघटक चंद्रकांत बनकर, अशोक दुधारे, आनंद खरे, अशोक कदम, दीपक निकम यांच्या हस्ते आकर्षक मेडल्स आणि चषक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धा यशस्वीतेसाठी सतीश बोरा, शैलेश रकिबे, अविनाश वाघ, नीरज राजभर, महेंद्र साळवे, वैशाली उशिरे, कविता कटारे, आनंद चकोर, राजू वाकडे आदीनी अथक परिश्रम घेतले. २९ जून रोजी पंचवटी येथील विभागीय क्रीडा संकुल येथे राज्य अजिंक्यपद सेपक टकरा स्पर्धा पार पडणार आहे.

अंतिम निकाल

– खुला गट मुले –

१) महाराष्ट्र – प्रथम.
२) दादरा– नगर हवेली – उपविजेता संघ
३) राजस्थान – तृतीय क्रमांक.

– ज्युनिअर गट मुले –

१) महाराष्ट्र – प्रथम.
२) राजस्थान – उपविजेता संघ
३) विदर्भ – तृतीय क्रमांक.

लॉरिट्झ नूडसनचा उत्पादन पोर्टफोलिओ

मुंबई । देशातील प्रमुख औद्योगिक क्लस्टर्स आणि ग्रोथ कॉरिडॉरना पाठबळ देण्याच्या उद्देशाने भारतीय इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनकडून उत्पादन पोर्टफोलिओचे अनावरण करण्यात आले आहे.या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा एक भाग म्हणून देशातील ३० औद्योगिक शहरांमध्ये उत्पादन आणि पायाभूत सुविधा तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी स्थानिक नेते,भागधारक आणि इकोसिस्टम भागीदारांशी संवाद साधण्यात येत आहे.

सह्याद्री हॉस्पिटलमध्ये अद्ययावत 'ब्रेनस्ट्रोक केअर सेंटर'

नाशिक । सह्याद्री सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला प्रगत स्ट्रोक सेंटर्ससाठी जागतिक स्ट्रोक ऑर्गनायझेशन व एनएबीएच कडून प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. रुग्णालयाच्या सेवा,सुरक्षा व गुणवत्तांमधील मूल्यांकनानंतर ही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे प्रमाणपत्र प्राप्त करणाऱ्या देशातील अव्वल तीन रुग्णालयांमध्ये सह्याद्री हॉस्पिटल्सची गणना झाली आहे.

जागतिक पातळीवर ब्रेनस्ट्रोक हे मृत्यूचे दुसरे तर अपंगत्वाचे तिसरे प्रमुख कारण ठरत आहे. भारतात दरवर्षी सुमारे अठरा लाख लोक स्ट्रोकला बळी पडतात. स्ट्रोकच्या उपचारामध्ये 'गोल्डनअवर'

म्हणजेच लक्षणे दिसल्यानंतरची पहिली साठ मिनिटे फार महत्वाची असतात. म्हणून वेळेत व गुणवत्ता पूर्ण उपचार देणारे रुग्णालय हेच रुग्णासाठी जीवनदायी ठरते.

येथे तज्ज्ञ डॉक्टर्स, न्यूरोआयसीयू व अनुभवी स्टाफ इंटरव्हेशनलन्यूरॉलॉजिस्ट अँड स्ट्रोकस्पेशालिस्ट डॉ. श्रीपाल शहा यांच्या नेतृत्वाखाली काम करणारी एक विशेष टीम आहे. यांत्रिक थ्रोम्बेक्टोमीसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. अनुभवी डॉक्टर्स, समर्पित न्यूरोआयसीयू, कुशल वैद्यकीय कर्मचारी आणि मेंदूविकार विभागाचे इंटरव्हेशनल न्यूरॉलॉजिस्ट व स्ट्रोक स्पेशालिस्ट डॉ. श्रीपाल शहा यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत विशेष स्ट्रोक टीम उपलब्ध आहे. मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमीसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज सुविधा उपलब्ध असल्याचे उपाध्यक्ष संजय चावला यांनी सांगितले.

सहकार पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठवा

नाशिक । राज्याच्या सहकार चळवळीच्या विकासात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कारांतर्गत राज्य स्तरावर एकूण पंचेचाळीस संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. अनुक्रमे एक लाख, एक्कावन्न हजार व पंचवीस हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप असणार आहे.

शासन स्तरावरील समितीमार्फत २६ सप्टेंबरपर्यंत पुरस्कारप्राप्त संस्थांची अंतिम निवड करण्यात येणार आहे. पुरस्काराविषयी अधिक माहिती सहकार विभागाच्या संकेतस्थळावर तसेच जिल्हा उपनिबंधक, तालुका उपनिबंधक, सहायक निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. प्रस्ताव १८ जुलै पर्यंत संबंधित तालुका उपनिबंधक, सहायक निबंधक कार्यालयाकडे दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक फयाज मुलानी यांनी केले आहे.

तनाएराची उत्पादनांवर सूट

मुंबई । टाटाचा अधिकृत ब्रँड तनाएराने चालू आर्थिक वर्षात सुमार तीस टक्के व्यवसायवाढ नोंदवली आहे. याच पार्श्वभूमीवर तनाएराने पहिल्यावहिल्या राष्ट्रीय सेलची घोषणा केली आहे.त्यामध्ये साडचा,रेडी-टू-वेअर सेट्स,अनस्टीच्ड कुर्ता सेट्स आणि सणासुदीसाठीच्या लेहेंगासारख्या विविध श्रेणींमध्ये तयार केलेल्या उत्पादनांवरचाळीस टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत आहे. चाळीसहून अधिक शहरांमध्ये दालनांचे जाळे असलेल्या तनाएराने जाहीर केलेल्या या सवलीतचा लाभ ग्राहकांनी घ्यावा असे आवाहन विक्री आणि विपणन अधिकारी सोमप्रभ कुमार सिंग यांनी केले आहे.

'एअरॉनॉमिक्स'साठी क्रेडाईचे पर्यावरणमंत्र्यांना निमंत्रण

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहरातील पर्यावरणविषयक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आणि लवकरच होणाऱ्या 'एअरॉनॉमिक्स' कार्यक्रमासाठी क्रेडाई नाशिक मेट्रोच्या शिष्टमंडळाने राज्याच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांना मुंबईत निमंत्रण दिले.

बैठकीत अध्यक्ष गौरव ठक्कर यांच्या नेतृत्वाखाली शहरातील हवेच्या गुणवत्तेची सद्यस्थिती, वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्या, औद्योगिक आणि वाहतूक प्रदूषणाचे परिणाम आणि त्यावर शाश्वत उपाययोजना यावर सखोल चर्चा करण्यात आली.

शहराचा विकास करताना पर्यावरण पूरक दृष्टीकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे. आमचा व्हाईट पेपर आणि 'एअरॉनॉमिक्स' कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही प्रशासन, व्यावसायिक आणि नागरिक यांच्यातील संवाद दृढ करून परिणामकारक उपाययोजना अमलात आणण्याचा प्रयत्न करत आहोत.

– गौरव ठक्कर

मनपा आयुक्त, विभागीय आयुक्त, एमपीसीबी व इतर अधिकाऱ्यांसह धोरण निर्मितीवर तसेच बांधकाम व्यवसायिकांना भेडसावणाऱ्या पर्यावरण विषयक नियमांबाबत चर्चा झाली.

महिंद्रा फ्युरियो एलसीव्हीचे अनावरण

नाशिक । प्रतिनिधी

महिंद्रा ट्रक ॲण्ड बस बिझनेस या कंपनीकडून नव्या महिंद्रा फ्युरियो एट एलसीव्ही ट्रकचे नुकतेच अनावरण करण्यात आले आहे. 'सर्वाधिक मायलेज घ्या, अन्यथा ट्रक परत द्या' अशी हमी कंपनीने दिली आहे.

फ्युरियो एट ही बावीस फुट लोड बॉडी असलेली चार व सहा टायर व्हेरिएंट्समध्ये येणारी भारतातील पहिली एलसीव्ही आहे. यामध्ये सात फुट रूंद लोडिंग एरिया, इन-हाउस एमडीआय टेक इंजिन, ड्युएल मोड फ्युएलस्मार्ट तंत्रज्ञान, आणि आयमॅक्स टेलिमेटिक्स अशा अत्याधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. ग्राहकांना अधिक नफा आणि मायलेज मिळावे, यासाठी छत्तीस तासात सर्व्हिस हमी (न झाल्यास तीन हजार रुपये प्रति दिवस) आणि अठ्ठेचाळीस तासात ऑनरोड न झाल्यास एक हजार रुपये प्रति दिवस भरपाई असा दुहेरी विश्वास देण्यात आला आहे.

'हीर एक्सप्रेस'चे पहिले गाणे प्रदर्शित

मुंबई । ऑगस्टमध्ये प्रदर्शित होणाऱ्या 'हीर एक्सप्रेस' चित्रपटातील वे रांझणा हे पहिले गाणे झी म्युझिक कंपनीकडून प्रदर्शित करण्यात आले आहे. संगीत, नृत्यदिग्दर्शन, चित्रीकरण आणि लोकेशन प्रेक्षकांना आवडत आहे. विशेषतः राजस्थानमधील जोधपूरच्या भव्य लोकेशन्सनी या गाण्याला एक वेगळा आयाम दिला आहे.

नुकताच चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. आणि आता गाणे प्रदर्शित झाल्यापासून प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. गाणे सिमर कौर आणि नवी सरन यांनी गायले आहे. संगीत एव्ही साराने दिले आहे. गीते हरमनजीत यांनी लिहिली आहेत, तर नृत्यदिग्दर्शन विपिन यांनी केले आहे.

स्पर्धेतून सुप्त कलागुणांना वाव : डॉ. गीते

नाशिक । वैद्यकीय शिक्षण घेताना 'मॉडेल मेकिंग' हे टीमवर्क असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्येकातील सुप्त गुणांची जाणीव होते. ही केवळ एक स्पर्धा नसून शरीर विज्ञान सहजपणे समजून घेण्याची कला आहे. त्यातून कल्पनाशक्ती आणि सर्जनशिलतेला चांगला वाव मिळतो, असे प्रतिपादन नाशिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. व्यंकट गीते यांनी केले.

नाशिकरोडच्या बिटको रुग्णालयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरीरक्रियाशास्त्र विभागात प्रथम वर्ष एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांसाठी बुधवारी (दि. २५) मॉडेल मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विविध प्रकारच्या शरीरक्रिया दर्शवणाऱ्या नऊ प्रतिकृती विद्यार्थ्यांच्या टीमने बनवल्या. अधिष्ठाता डॉ. गीते यांच्या उपस्थितीत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. परीक्षक म्हणून डॉ. दीपांजली लोमटे, डॉ. स्मिता आव्हाड, डॉ. अनिता जाधव व डॉ. श्रीराम गोसावी या वरिष्ठ अध्यापकांची तज्ज्ञ समिती नेण्यात आली होती. मॉडेल्सचे निरीक्षण व मूल्यमापन करण्यासाठी वैज्ञानिक अचूकता, सर्जनशिलता नावीन्यपूर्णता शैक्षणिक मूल्य व प्रभावी सादरीकरण या बाबी

प्रामुख्याने विचारात घेण्यात आल्या. अधिष्ठातांनी प्रत्येक मॉडेलचे निरीक्षण केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. समितीने अहवाल सादर केल्यानंतर प्रथम व द्वितीय क्रमांक टीमला पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. तर इतर टीमला प्रोत्साहन म्हणून उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. स्पर्धा यशस्वीतेसाठी शरीरक्रियाशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. संदीप गुंडरे, सहयोगी प्राध्यापक डॉ. अनिता जाधव, सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपाली भगत, डॉ. उद्धव जोगदंड, डॉ. शंतनू रोही, डॉ. स्वप्निल कोकाटे यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र सेपक टकरा स्पर्धाचे उद्घाटन

नाशिक । नाशिक जिल्हा सेपक टकरा असोसिएशनच्या वतीने आणि महाराष्ट्र सेपक टकरा असोसिएशनवतीने नाशिकच्या पंचवटी येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या हॉलमध्ये वरिष्ठ गटाच्या ३५ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मंचावर क्रीडा उपसंचालक स्नेहल साळुंखे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, सेपक टकरा असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत बनकर, सचिव दीपक निकम, अध्यक्ष आनंद खरे, मराठा महासंघाचे युवा अध्यक्ष व्यंकटेश मोरे, ग्रामीण अध्यक्ष अशोक कदम, नरेंद्र बनकर, महाराष्ट्र सेपक टकरा असोसिएशनचे सचिव योगेंद्र पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

वर्कर्स फेडरेशन नाशिक पतसंस्थेचा कार्यक्रम

नाशिक । प्रतिनिधी

वर्कर्स फेडरेशनच्या नाशिक पतसंस्थेच्या वतीने आर. सी. चौधरी यांच्या संकल्पनेतील माझी इयत्ता पहिली या कार्यक्रमाचे आयोजन त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाकेहर्ष या गावी करण्यात आले होते.

या कार्यक्रमातंर्गत विद्यार्थिनींना पतसंस्थेच्या वतीने स्कूल बॅग, स्वेटर व इतर साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी व्ही. डी. धनवटे तर प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे उपसरचिटणीस अरुण म्हस्के, राज्य संयुक्त सचिव पंडीतराव कुमावत, झोनल सचिव दिपक गांगुर्डे, सर्कल प्रमुख महेश वाळुंज, नाशिक सर्कल सचिव महेश कदम, नाशिक पतसंस्थेचे चेअरमन महेश पगारे, उपसभापती नामदेव लबडे, सचिव प्रदीप मोरे, शाखाप्रमुख महेश लांडगे तसेच संचालक बबन शिंदे, सुरेश उगले, भाऊसाहेब कुकडे, सुनील वाघ, सोमनाथ चव्हाण उपस्थित होते. मुख्याध्यापक श्याम देशमुख, विजय भरीत, हिरामण पालवे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.